ISBN- 978-93-82451-65-5

# स्वातंत्र्य चळवळ आणि भारतीय कामगार चळवळीचे योगदान

प्रा. रमेश नरसिंग थोरात,
एम.जे.एस.कॉलेज, श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.
मो. ९४२०६६६९९०

ब्रिटीशांच्या व्यापारी धोरणामुळे भारतातील कुटिरोद्योगाचा ऱ्हास झाला. इंग्रजांच्या व्यापारी नितिमुळे त्यांनी भारतात आपल्या उद्योगाची हळुहळु मुहर्तमेढ रोवली. खरेतर युरोपातील औद्योगिक क्रांतीने भांडवलदार व्यवस्थेबरोबर कामगार वर्गालाही जन्म देऊन विषम वर्गव्यवस्था निर्माण झाली. या क्रांतीने युरोपातील समाजजीवन संपूर्णपणे ढवळून निघाले. त्याचे लोन वसाहतवादामुळे भारतात आले. या औद्योगिक क्रांतीने मध्ययुगाचा अंत घडवून आला. म्हणुन आधुनिक युग अवतरले. तळागाळातील वर्गात जागृती घडवून आली. शोषणाला वाचा फुटल्या, न्याय हक्क मिळविण्यासाठी कामगार एकत्र आले. त्यामुळे समान हितसंबंध गुंतलेले कामगार एकत्र येऊन व्यवस्थेवर दबाव निर्माण करु लागले.

१९ व्या शतकाच्या मध्याला भारतात कापड गिरण्या सुरु झाल्या. मुंबईतील प्रसिध्द व्यापारी कावसजी दावर यांनी ५० व्यापारी एकत्र करुन त्यांच्या सहाय्याने ५ लाख रुपये भांडवलाची संयुक्त स्टॉक कंपनी काढली आणि ११ जुले १८५१ रोजी पहिली कापड गिरणीचा प्रारंभ झाला. १८५४ ला माणिकजी पेटीट यांनी दुसरी तर १८६० ला अनेक गिरण्या सुरु झाल्या. १८७२-७३ पर्यंत गिरण्यांची संख्या १८ पर्यंत गेला. १८९० पर्यंत १३७ कापड गिरण्या सुरु झाल्या. त्यापैकी ९४ मुंबई इलाख्यातील होत्या. पहिले महायुध्द सुरु होईपर्यंत गिरण्यांची संख्या २६४ पर्यंत पोहोचली होती. हळुहळु औद्योगिकरण वाढत गेले. परंतु त्याचबरोबर कामगारांचेही शोषन वाढत गेले. त्यांचे अनेक प्रश्न निर्माण झाले.

भारतात जसजसा विविध उद्योगधंद्याचा विकास झाला, तसतशी कामगारांच्या संख्येतही वाढ होत गेली. इ.स. १८६६ मध्ये वस्त्र उद्योग करणाऱ्या कामगारांच्या संख्या ३००० होती, तर १९०५ मध्ये हीच संख्या १९५००० झाली. परसन उद्योगात इ.स.१८७९-८० काम करणाऱ्या कामगारांची संख्या २७४९४ होती. तर इ.स. १९०६ मध्ये १५४९६२ इतकी कामगारांची संख्या वाढली. इ.स. १९०४ मध्ये कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्यांची संख्या ७५४४९ एवढी वाढली. उत्तरोत्तर कामगारांच्या संख्येत वाढ होत गेली. कामगारांची जागृती झाल्यामुळे १८८१, १८९१, १९११, १९९२, १९३४, १९४६ साली विविध कायदे करण्यात आले. १८८१ च्या कायद्याने सर्व प्रकारच्या कामगारांकरिता साप्ताहिक सुट्टीची तरतुद करण्यात आली. तर १८४८ मध्ये या कायद्याची परिपास म्हणजे वर्षभर चालणाऱ्या कारखान्यात कामाचे तास रोज नऊ करण्यात आले. १९२३ च्या कायद्याने खाणीत काम करण्यास मुलांना बंदी घालण्यात आली. त्यामुळे बहुतांश मुलांना शिक्षणामुळे दरवाजे उघडे झाले. त्यांचे थोडेफार वैचारिक शिक्षण झाले. त्यांना पारतंत्र्य काय आहे आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी काय केले पाहिजे याची जाणीव झाली.




ISBN- 978-93-82451-65-5

भारतीय जनता इंग्लडच्या राणीची प्रजा बनल्यामुळे भारतीयांची युरोपशी नाळ जोडली गेली. इ.स. १८७५ मध्ये कामगार संघटनेच्या दिशेने काही पाऊल पडले. त्यात बंगाली सोराबजी शापूरजी हे आघाडीवर होते. कामगार व स्त्री कामगार यांचे हाल कमी व्हावेत यासाठी सरकारला विनंती करणे हे त्यांच्या कार्याचे उद्दिष्ट होते. परंतु गिरणी मालकांनी सरकारला हाताशी धरुन सोराबजींचे प्रयत्न हाणून पाडले. यावेळी कामगारही आपल्या हक्कांबाबत तेवढे जागरुक नव्हते. पुढे खऱ्या अर्थाने इ.स. १८९० मध्ये नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधक गृहस्थाने मुंबई गिरणी कामगार संघटना स्थापन केली. परंतु त्यांच्याकडे पैसा व सभासदांची यादी नव्हती. संप तर कधी विनंती करुन त्यांनी कामगारांचे प्रश्न सोडविले.

नारायण मेघाजी लोखंडे इ.स. १८८१ व १८९१ च्या फॅक्टरी ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी इ.स. १८९२ मध्ये गिरणी कामगारांचे संप घडवून आणले पण हे संप गिरणी मालक व पोलिस अधिकाऱ्यांनी चिरडून टाकले. इ.स. १८९० ते १९१७ च्या काळात विविध औद्योगिक केंद्रात कामगारांनी संप केले. लोकमान्य टिळकांना इ.स. १९०८ मध्ये राजद्रोहाची शिक्षा झाली. या शिक्षेच्या निषेधार्थ याच वर्षी मुंबईतील गिरणी कामगारांनी सहा दिवस संप केले आणि ब्रिटिशांविरुध्द भूमिका घेतली.

१९०५ मध्ये बंगालच्या फाळणीमुळे देशभर स्वदेशी चळवळीचे वातावरण निर्माण झाले. या राष्ट्रीय घटनेचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम कामगार चळवळीवर होते, साहजिकच होते. कामगारांनी संप पुकारला, पोस्ट खात्याच्या कामगारांनीही एकत्र येऊन टिळकांना शिक्षा झाल्याच्या निषेधार्थ २५ ते २८ जुलै रोजी सहा दिवसांचा संप करुन आपल्या राष्ट्रीय अस्तित्वाची जाणीव करुन दिली. कामगारांची शक्ती दिवसेंदिवस वाढतच गेली. त्यामुळे राष्ट्रीय आंदोलनात त्यांचे महत्त्व वाढू लागले.

कामगार राष्ट्रीय प्रश्नांशी जोडले जाऊ नयेत किंवा कामगार शक्तीच राष्ट्रीय चळवळीला कोणत्याही प्रकारचा फायदा होऊ नयेत याची काळजी इंग्रजांनी घेतली असल्यास नवल नाही. त्यांनी १९०८ साली स्मिथ कमिशन अहवालावर आधारित १९११ चा फॅक्टरी ॲक्ट मंजूर केला. मुलांच्या कामाचे सहा तास केले. स्त्रियांच्या कामाला रात्रीची बंदी घातली. पुरुषांच्या कामाचे तास १२ ठेवले गेले. आरोग्याच्या दृष्टीने काही नवे नियम बनविण्यात आले.

ISBN- 978-93-82451-65-5

मुंबईत लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ३१ ऑक्टोबर १९२० रोजी इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले या अधिवेशनात मोतीलाल नेहरु, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, बॅ. जिना व इंग्लडमधील मजूर पक्षाचे नेते कर्नल वेजवूड हजर होते. व्यासपीठावरुन लाला लजपतराय यांनी भांडवलदार मजूर वर्गाचे शोषन करतात. कामगारांनी संघटित व्हा, चळवळ करा व लोकांना शिकवा असा सल्ला देऊन कामगारांना संघटीत केले. तसेच कामगारांना मतांचा अधिकार दयावा व त्यांचा प्रतिनिधी कायदेमंडळात असावा असा ठराव या अधिवेशनात पास केला. म्हणजे ब्रिटिशांच्या विरोधात त्यांनी कामगारांचे संघटन केले व कामगारांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करुन घेतले.

१९१४ साली पहिले महायुध्द उद्भवले त्यानंतर महागाई वाढली तसेच कारखान्याचे नफेही वाढले परंतु कामगारांचे पगार वाढविले गेले नाहीत. त्यामुळे कामगारांत असंतोष निर्माण झाला. गांधींच्या नेतृत्त्वाखाली सामुदायिक चळवळ सुरु झाली. होती. रशियातील १९१७ च्या कामगार क्रांतीचे आवाज कानावर पडत होते. त्यामुळे देशातील एकंदर परिस्थिती संघटनेला व चळवळीला अनुकुल अशीच होती. त्यामुळे इ.स. १९१७ नंतर अनेक ठिकाणी कामगार संघटनांचा उदय झाला. ही परिस्थिती राष्ट्रीय चळवळीला फायदेशीर ठरली.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतीमान झाल्यामुळे अनेक कामगार स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले. गांधींनी राष्ट्रीय व्यासपीठावरुन कामगार, शेतकरी यांच्या मागण्यांचे समर्थन केले व त्यांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करुन घेतले. यावेळी कामगारांना ब्रिटीश सैन्याशी संघर्ष करावा लागला. वंगभंगाच्या चळवळीत कलकत्ता येथील कामगारांनी सहभाग घेतला. यानंतर मुंबईतील सुतीमिल या ठिकाणी कामगारांनी हरताळ पाळला. इ.स. १९१९ ते १९२१ मध्ये विविध ठिकाणी कामगारांनी हरताळ केले. यानंतर आपली देशव्यापी संघटना असली पाहिजे, असे कामगारांना वाटू लागले. या संघटनेला देशव्यापी इंग्रजांविरुध्द लढा उभारावा असे अनेक कामगारांना वाटू लागला, त्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत.

महाराष्ट्रात एस.एम.जोशी यांच्या नेतृत्वाखाली जहाल सदस्यांनी 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' या संघटनेमधून बाहेर पडून १९२९ मध्ये 'भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसची' स्थापना केली. साम्यवादी विचारांच्या कामगारांनी रणदिवे व देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी संघटन करुन देशव्यापी आंदोलनाची भूमिका स्विकारली. १९२१ पासुनच मुंबईत गिरणी कामगारांत साम्यवादी नेत्यांचा प्रभाव प्रस्थापित होऊ लागला होता पण १९२६ पासून तो अधिक जाणवू लागला. १९२० च्या दरम्यान भारतीय कामगार चळवळीत उजवे व डावे असे दोन गट पडले. या दोन गटात संघर्षामुळे चळवळीची पीछेहाट झाली. संप अयशस्वी झाले. शिवाय कामगार चळवळीला अनिष्ट वळण लागले. तरीपण त्यांची भूमिका राष्ट्रीय आंदोलनाला पोषक ठरले.




ISBN- 978-93-82451-65-5

ब्रिटिश सरकारने बहुउद्देशिय धोरण स्विकारले, एका बाजूला साम्यवादी प्रसार दडपून टाकण्यास प्रयत्न केला तर दुसऱ्या बाजूला काही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न आणण्याचे सरकारने रॉयल कमिशन नेमले. १९८९ च्या नागपूर अधिवेशनामध्ये पं. नेहरुंच्या नेतृत्वाखाली जहाल पक्षाने कमिशनवर बहिष्कार टाकला या काळात ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस साम्यवादयांच्या पूर्ण प्रभावाखाली आहे. त्यामुळे काँग्रेसमधील मवाळ नेते अस्वस्थ झाले. तरी त्यांनी स्वातंत्र्य संग्रात हिरारीने भाग घेतला.

१९२९ च्या जागतीक मंदीच्या प्रभावामुळे मालाचा उठाव न झाल्यामुळे कारखानदारांनी कामगारांना कामावरुन कमी केले. त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष भडकू लागला. त्याचा उपका साम्यवादी नेत्यावर ठेवून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. त्यामुळे कामगार चळवळ थंडावली. या काळात सरकारने दोन विधेयके पास करुन कामगारांच्या हक्काची गळचेपी केला. कामगारांसाठी १९३९ मध्ये डॉ. आंबेडकरांनी 'मजूर पक्षाची' स्थापना केली. त्या पक्षाच्या मार्फत त्यांनी कामगारांच्या न्याय हक्कासाठी खुप संघर्ष केला. त्यामुळे ते राष्ट्रीय आंदोलनाकडे आकर्षित झाले. दुसरे महायुध्द सुरु झाल्यामुळे कामगारांना जादा तास काम करावे लागले. १९४२ साली सरकारने 'त्रिपक्ष समिती' नेमली. सरकारला कामगारांची वारंवार सल्ला घेतल्यामुळे कामगार चळवळीला महत्त्व आले. १९४२ ला 'भारत छोडो' आंदोलन सुरु झाले. अखिल भारतीय कामगार संघटनेचे तटस्थतेचे धोरण स्विकारले परंतु हे सामग्राज्यवादी युध्द आहे, म्हणून एम.एन.रॉय यांनी त्यास विरोध केला. अनेकांनी काँग्रेसच्या चळवळीला पाठींबा दिला.

कामगार संघटीत झाल्यानंतर त्यांना भारताच्या पारतंत्र्याची जाणीव झाली. भारत स्वतंत्र झाल्याशिवाय आपले प्रश्न मार्गी लागणार नाहीत. म्हणून त्यांनी संप, हरताळ, घडवून आणले. सविनय कायदेभंग, 'भारत छोडो' आंदोलनात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग घेतला आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपलेही योगदान दिले.

संदर्भ -


१) डॉ. कटारे अनिल, 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', विद्या बुक पब्लिकेशन औरंगाबाद.

२) फडके य.दी., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे - ३०.

३) प्रा. दिनेश मोरे, 'आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास', के.एस.पब्लीकेशन्स, पुणे - ११.

४) प्रा. ज्योती राऊत, 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे - ३०.

5) प्रा. घाडगे, प्रा. विद्यासागर, 'आधुनिक भारताचा इतिहास', सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे - 30.


*****